# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक:- ६४-२२** **दिनांक :- २५/०२/२०२२**

## चैनचोरी, जबरी चोरी व फसवणुकीच्या गुन्हयातील आरोपीतांना अटक करुन एकुण १,४८,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत-नवघर पोलीसांची कामगिरी.

दिनांक ०८/०२/२०२२ रोजी सकाळी ०८.०० वा. तक्रारदार सौ. राजेश्वरी विनोद सिंग, वय ४० वर्षे ह्या त्यांच्या मुलास शाळेत सोडण्यासाठी स्कुल बसची वाट पाहत रोड किनारी उभ्या असतांना एका मोटार सायकलवरील दोघा अनोळखी इसमांपैकी मागे बसलेल्या इसमाने तक्रारदार यांच्या गळयातील ५२,०००/- रु. किं. ची दिड तोळे वजनाची सोन्याची चैन जबरीने खेचुन घेवुन पळुन गेले होते. सदरबाबत तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ९०/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३९२, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदरचा गुन्हा उघडकीस आणणेबाबत वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे नवघर पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचे घटनास्थळावरील व आजुबाजुचे सी.सी.टिव्ही कॅमेऱ्यांची पाहणी करुन फुटेजमध्ये दिसुन येणारे इसम हे मालवणी, मुंबई येथे राहणारे असल्याची बातमीदारांमार्फत माहिती मिळुन आली. त्याप्रमाणे आरोपीतांचा तांत्रीक बाबींवरुन तपास करीत असतांना ते दिल्ली येथे असल्याचे दिसुन आले. त्यामुळे वरिष्ठांचे आदेशान्वये नमुद गुन्हयातील आरोपीतांचा शोध/तपास करणेसाठी दिल्ली येथे पोलीस पथक रवाना करुन दोन्ही आरोपी १) रिजवान हैदर वली हुसेन हैदर, वय २५ वर्षे, रा. मालवणी, मुंबई मुळ रा. उत्तरप्रदेश व २) शेहजादा ऊर्फ विकी इमाम मोहमंद आरीफ, वय ३६ वर्षे, मुळ रा. अमरोहा, उत्तरप्रदेश यांना दिल्ली येथुन ताब्यात घेवुन गुन्हयात अटक करण्यात आलेली आहे. आरोपीतांनी जबरी चोरी केलेली सोन्याची चैन व गुन्हयात वापरलेली बजाज पल्सर मोटार सायकल अशी एकुण ८२,०००/- रु. किंमतीची मालमत्ता हस्तगत करुन गुन्हयाची उकल करण्यात आलेली आहे.

दिनांक १८.०२.२०२२ रोजी रात्री २०.३० वा. चे सुमारास तक्रारदार श्री. राकेश तानाजी सुरवसे, वय २८ वर्षे, हे इंद्रलोक फेज-६, म्हाडा बिल्डींग बाजुकडे जाणा-या रोडवर गेले असतांना तेथे आलेल्या तिन अनोळखी इसमांनी तक्रारदार यांना मारहाण करुन १० ग्रॅम वजनाची सोन्याची चैन, विवो कंपनीचा मोबाईल फोन व ३०१५ रु. अशी एकुण ६९,०१५/- रु. ची मालमत्ता जबरीने चोरी करुन पळुन गेले होते. सदरबाबत तक्रारदार यांनी दिलेल्या फिर्यादवरुन नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ११७/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३९४, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्हा उघडकीस आणण्याच्या अनुषंगाने नवघर पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकातील

अधिकारी व अंमलदार यांनी बातमीदारांमार्फत माहिती मिळवुन सदरचा गुन्हा करणारे आरोपी क्र. १) सचिन अनील चौबे, वय १९ वर्षे, रा. मिरारोड पुर्व, २) निर्मल महेंद्र सिंग, २६ वर्षे, रा. मिरारोड पुर्व व ३) राज दिपक बम, वय २० वर्षे, रा. मिरारोड पुर्व यांना अटक करुन त्यांच्याकडुन जबरी चोरी केलेला तक्रारदार यांचा मोबाईल फोन, सोन्याची चैन अशी एकुण ६६,०००/- रु. किंमतीची मालमत्ता हस्तगत करुन गुन्हयाची उकल केली आहे.

दिनांक १६.०२.२०२२ रोजी सकाळी ११.०० वा. चे सुमारास तक्रारदार श्री. गौतम राधेश्याम जिती, वय ४१ वर्षे, हे बँक ऑफ बडोदा, जैसल पार्क, भाईंदर पुर्व येथुन काढलेले ०२,१०,०००/- रु. मोजत असतांना एक अनोळखी इसम फिर्यादी यांच्या जवळ येऊन पैसे स्वत:चे हातात घेवुन चेक करुन देतो असे बोलुन २००० रु. दराच्या २२ नोटा काढुन घेवुन ४४,०००/- रु. ची फसवणुक करुन पळुन गेला होता. सदरबाबत तक्रारदार यांनी दिलेल्या फिर्यादवरुन नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I १०७/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४२० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर आरोपीताचा शोध घेणेकामी अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचे ठिकाणावरील व आजुबाजुचे सी.सी.टि.व्ही कॅमेऱ्यांची पडताळणी केली असता गुन्हा करणा-या आरोपीसोबत त्याचा आणखीन एक मोटार सायकलवरील साथीदार असल्याचे तपासात निष्पन्न झाले. गुन्हयाचे तपासात प्राप्त करण्यात आलेल्या फुटेज मधील आरोपीतांची नावे १) आरोपी आयुब करीम सय्यद व त्याचा २) अस्लम नावाचा साथीदार, रा. इराणी वस्ती, आंबिवली, कल्याण असे असल्याची माहिती बातमीदारांकडुन निष्पन्न झाले. नमुद आरोपीतांचा आंबिवली, कल्याण येथे तपास करीत असतांना फिर्यादी यांची फसवणुक करणारा आरोपी आयुब करीम सय्यद, वय ४५ वर्षे, यास ताब्यात घेवुन अटक करुन गुन्हयात वापरलेली होंडा ॲक्सेस मोटार सायकल क्र. एम.एच-०५-डीएन.३४०२ ही जप्त करुन गुन्हयाची उकल करण्यात आली असून पढिल तपास चालू आहे.

वरील कामगिरी श्री. अमीत काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, डॉ. शशीकांत भोसले, सहा. पोलीस आयुक्त, नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, पोनि/प्रकाश मासाळ (गुन्हे), सपोनि/योगेश काळे, पोउनि/संतोष धाडवे, पोउनि/ प्रमोद पाटील, पोना/भुषण पाटील, पोशि/ गणेश जावळे, संदिप जाधव, सुरज घुनावत, विनोद जाधव यांनी केलेली आहे.

---------------ooooo----------------